**नि. फौ. खटला क्र.३३/२०२५**

**निशाणी क्र.२९**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०१ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **माझे नांव** | : | सिराज चॉदपाशा बावडीवाले, |
| **वय** | : | २७ वर्षे, **धंदा** : मजुरी, |
| **राहणार** | : | वलांडी, ता. देवणी, जि. लातूर. |

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.एस. कुलकर्णी यांचेमार्फत ::**

पोलिसांनी मला बोलावले आणि माझी सही घेतली होती. परंतु कशावर सही केली हे मला माहीत नाही. आता मला दोन जप्ती पंचनामे दाखविले. त्यावर माझ्या सह्या आहेत. परंतु त्यामधील मजकूर मला माहीत नाही. पोलिसांनी माझ्यासमक्ष जप्ती केली नाही. सदर सह्यांना अनुक्रमे नि.३० व ३१ देण्यात येते.

०२. **साक्षीदार पूर्वीच्या कृतीवर कायम नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरून साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते.**

०३. दि.०५/०३/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता पोलीस ठाणे देवणी येथे पोलिसांनी माझ्यासमक्ष शेख इब्राहीम कडून लोखंडी रॉड जप्त केला आणि पंचनामा लिहिला असे घडले नाही. दि.०५/०३/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता पोलीस ठाणे देवणी येथे पोलिसांनी माझ्यासमक्ष शेख नूर अली कडून काठी जप्त केली आणि पंचनामा लिहिला असे घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला पंचनामे वाचून दाखविले व मी त्यानंतर सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना मदत करण्यासाठी खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना ओळखतो.

सरतपास पूर्ण.

:: **<u>आरोपीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. एम.एस. नागराळे यांनी नाकारला</u>** <u>::</u>

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.
दि.२७/०३/२०२६.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.